ISSN 2278-8808
UGC APPROVED SR. NO. 45269
SJIF 2016 = 6.177
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था व संशोधन केंद्राचा अभ्यास

**अमिता शशिकांत डंबीर & डॉ. अरुणा भांबरे**

*ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन आझम कॅम्पस, पुणे*

*श्री. समर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन अॅन्ड रिसर्च,म्हसणे फाटा, ता. पारनेर जि. अहमदनगर*

**Abstract**

*सर्वसमावेशित शिक्षण व्यवस्थेत सौम्य ते मध्यम स्वरुपाचे अपंगत्व असलेल्या सर्व अपंग मुलांना त्यांच्या घराजवळ सामान्य शाळेत समाविष्ट केले जाते. मुलांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन आवश्यक त्या वेळी तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घेतले जाते. ही व्यवस्था यशस्वी करण्यासाठी सामान्य शिक्षक, पालक, लोकप्रतिनिधी व समाजातील इतर घटकांना प्रशिक्षण देऊन त्यांच्या सहकार्याने सर्वसामान्य मुलांबरोबर अपंगांना शिक्षण देणे हे या व्यवस्थेत अभिप्रेत आहे. याचे महत्व लक्षात घेता, महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील तसेच शहरातील अपंगांच्या पुनर्वसनाची व शिक्षणाची गरज लक्षात घेता, श्री. रघुनाथ गोविंद काकडे यांनी ६ नोव्हेंबर १९५६ रोजी अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था व संशोधन केंद्राची स्थापना केली. १९८१ साली जागतिक अपंग दिनाच्या निमित्ताने संस्थेत मुलींचा विभाग सुरु करण्यात आला. मुलींची वाढती संख्या लक्षात घेऊन १९९२ साली मुलींसाठी वसतिगृहाची स्वतंत्र इमारत बांधली. या संस्थेत या मुलांना आपल्या जबरदस्त मानसिक ताकदीच्या बळावर शारिरीक कमतरतेवर मात करुन यशस्वी आयुष्य जगण्यासाठी प्रेरणा देणे तसेच विद्यार्थ्यांना समर्थ, स्वावलंबी व जबाबदार नागरिक बनविणे ही उद्दिष्ट्ये साध्य झालेली आहेत. ती पुढील लेखातून समोर येतात.*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

स्थापना -

साधारणपणे १९६० साली पोलिओ आजाराचे प्रमाण वाऱ्यासारखे **पसरत** चालले होते. त्यामुळे अपंगत्वाला आळा घालणे फारच अवघड झाले होते. मुलांना अपंगत्व आल्याने आई- वडिलांचे त्यांकडे दुर्लक्ष होते, समाजाने त्यांना नाकारले अशा गोष्टी प्रकर्षाने समोर येऊ लागल्या. याच काळात भारत सेवक समाजाचे काम देशभरात जोरात चालु होते. याच संस्थेसाठी रघुनाथ गोविंद काकडे हे पुण्यातील कार्यकर्ते म्हणून काम करायचे. एकुणच अपंगत्वाबाबतची ही परिस्थिती पाहून काकडे यांनी यासाठी काहीतरी करण्याचे मनोमनी ठरविले.

महाराष्ट्रातील खेड्यापाड्यातील तसेच शहरातील अपंगांच्या पुनर्वसनाची व शिक्षणची गरज तसेच त्यांना सुखकारक जीवन देण्यासाठी स्वावलंबी बनविण्यासाठी काकडे यांनी ६ नोव्हेंबर १९५६ रोजी अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था व संशोधन केंद्राची स्थापना केली. पुण्यातील कोथरूड परिसरात

एक छोटासा बंगला भाड्याने घेऊन, अवघ्या ६ मुलांनिशी १०-१२ खाटांच्या आधारे त्यांनी समाजकार्याचे बीज पेरले.

पुढे त्यांच्या कार्याला प्रतिसाद मिळू लागला आणि जागा कमी पडू लागली. त्यामुळे काकडे यांनी तत्कालीन मा. मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांच्याकडे संस्थेच्या जागेसाठी मागणी केली. काकडे यांचे कार्य पाहून मुख्यमंत्री यांनी त्यांना तीन जागांचे पर्याय सुचविले. त्यापैकी वानवडी येथील जागेत संस्थेचे पुढील कार्य उभारण्याचा काकडे यांनी निर्णय घेतला व संस्था १९५६ साली नवीन जागेत स्थलांतरीत झाली. सुरुवातीला ४०-५० मुलांना राहता येईल व उपचार करता येईल अशा प्रकारची सोय करण्यात आली. १९८१ साली

'जागतिक अपंग दिना'च्या निमित्ताने संस्थेत मुलींचा विभाग सुरु करण्यात आला. मुलींची वाढती संख्या लक्षात घेऊन १९९२ साली मुलींसाठी वसतिगृहाची स्वतंत्र इमारत बांधली.

आज पुण्यातील वानवडी येथे साडे तीन एकर जमिनीवर संस्थेच्या भव्य अशा वास्तुमध्ये ग्रंथालय, व्यवसायपूर्व प्रशिक्षण, छोटे रुग्णालय, सांस्कृतिक सभागृह बांधले आहे.

सध्या संस्थेत महाराष्ट्राच्या २८ जिल्ह्यातील खेड्यातून आलेली १८० मुले व ८५ मुली असे एकूण २६५ विद्यार्थी आहेत. यामध्ये पुणे, मुंबई शहरासह कर्नाटक, बिहार राज्यातील सुद्धा विद्यार्थी आहेत. ही सर्व मुले अस्थिव्यंग (पोलिओ)ग्रस्त अपंग असून कमी उत्पन्न गटातील आहेत. या सर्वांना त्यांच्या राहत्या ठिकाणी उपलब्ध नसलेल्या शेक्षणिक व वैद्यकीय सुविधा इथे पुरविल्या जातात.

संस्थेची **उद्दिष्ट्ये-**

१) या मुलांना आपल्या जबरदस्त मानसिक ताकदीच्या बळावर शारिरीक कमतरतेवर मात करुन जगण्यासाठी प्रेरणा देणे.

२) विद्यार्थ्यांना समर्थ, स्वावलंबी व जबाबदार नागरिक बनविणे.

**संस्थेतील शैक्षणिक सुविधा-**

संस्थेतील विद्यार्थ्यांना इ. १ली ते इ. ८वी पर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था संस्थेतील प्राथमिक शाळेत करण्यात आली आहे. तर त्यापुढील इ.९वी व १० वीचे विद्यार्थी संस्थेजवळील शाळांमध्ये इतर सामान्य मुलांबरोबर शिक्षण घेतात.

सध्याचे स्पर्धेचे युग लक्षात घेवून संस्थेतील माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी, गणित, शास्त्र इ. विषयांचे विशेष वर्ग चालविले जातात.

व्यवसाया**भिमुख प्रशिक्षण-**

भविष्यात हे विद्यार्थी समर्थ, स्वावलंबी व जबाबदार नागरिक बनावेत, यासाठी ही संस्था त्यांना विविध प्रकारचे व्यवसायपूर्व प्रशिक्षण देते. याकरिता संस्थेत स्वतंत्र कक्ष असून संगणक, विद्युततंत्रज्ञ (इलेक्ट्रिशियन व वायरमन), फोटो लॅमिनेशन, शिवणकला, सुतारकला, हस्तकला, वेतकाम, आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्य विकास, संगीत इत्यादींचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येते. २० संगणकांची अद्ययावत

संगणक प्रशिक्षण केंद्राचा विशेषत्वाने उल्लेख करता येईल.

याच बरोबर विद्यार्थ्यांना मेणबत्त्या, अगरबत्त्या, सुगंधी अत्तर, कृत्रिम पुष्पगुच्छ तयार करणे, सिरॅमिक चे नक्षीकाम करणे अशा हस्तकलाही शिकविल्या जातात. या माध्यमातून त्यांना उपजिवीकेचे साधन तर मिळतेच पण कलाविष्काराचे समाधानही मिळते. या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन व विक्री केली जाते.

ग्रंथालय-

अद्ययावत असलेले संस्थेचे ग्रंथालय बालवाङ्मयाने समृध्द करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या ग्रंथालयात ६,००० पुस्तकांचा संग्रह आहे. याशिवाय शैक्षणिक ऑडिओ कॅसेट्स व व्हिडिओ कॅसेट्स उपलब्ध आहेत.

**शिक्षणोत्तर उपक्रम कला-साहित्य-क्रिडा**

सुसंस्कृत, अभिरुची संपन्न व परिपूर्ण जीवन याही विद्यार्थ्यांना जगता यावे यासाठी संस्था नेहमी प्रयत्नशील राहिली आहे. संस्थेमध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच राष्ट्रीय उत्सव साजरे केले जातात. त्याचबरोबर जागतिक अपंग दिवसाच्या निमित्ताने प्रतिवर्षी प्रकट समारंभाचे आयोजन केले जातात. यात संस्थेतील विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्याचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून संस्थेत बालविकास वर्ग, विविध खेळ व क्रिडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचबरोबर उत्सव, सण समारंभ ही साजरे केले जातात. विद्यार्थ्यांची भाषणे, कथाकथन यांचेही आयोजन केले जाते. याद्वारे मुलांवर उच्च विचार व सांस्कृतिक मुल्यांचे संस्कार सहजगत्या होतात.

मा. पंतप्रधानांना अपेक्षित असलेल्या स्कील डेव्हलपमेंटची सुरुवात संस्थेने २ वर्षांपासुन मोबाइल रिपेअरींग व कॉम्प्युटर हार्डवेअर या कोर्सद्वारे केली आहे. तसेच या वर्षी विद्यार्थ्यांना डिजीटल इंडिया लिटरसी व स्पोकन इंग्लिश चे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे

क्रिडा-

अपंग मुलांच्या दरवर्षी जिल्हास्तरीय क्रीडा गटामध्ये या संस्थेमधील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारात भाग

घेवून १४ सुवर्ण, १२ रौप्य व ८ कांस्य अशी एकूण ३४ पदके पटकावून सर्वसाधारण विजेतेपद (चॅम्पियनशीप ट्रॉफी) विद्यार्थ्यांनी पटकावली. तसेच २६ डिसेंबर रोजी सणस ग्राऊंड, पुणे येथे झालेल्या क्रिडास्पर्धेमध्ये अस्थिव्यंग गटात संस्थेतील विद्यार्थ्यांनी विविध क्रिडा प्रकारात भाग घेवून ३१ सुवर्ण, १७ रौप्य व ८ कांस्य पदके अशी एकूण ५६ पदके पटकावून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

आर्थिक स्थिती निधी-

या संस्थेस महाराष्ट्र शासनाची परवानगी असल्याने शासनाकडून पुणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण खात्यामार्फत प्रत्येक अपंग विद्यार्थ्यामागे रु. ९०० फक्त मासिक अनुदान मिळते. तसेच कर्मचाऱ्यांच्या पगारावर १०० टक्के अनुदान मिळते. परंतु वाढत्या खर्चाच्या तुलनेने शासनाकडुन मिळणारे अनुदान अपुरे

पडते. त्यामुळे इतर सर्व खर्चासाठी देणगीदारांच्या सहाय्याने निधी उभा करावा लागतो. यासाठी अनेक देणगीदार संस्थेस वस्तुरुपाने व आर्थिकरुपाने मदत करतात.

विद्यार्थ्यांसाठी विमा योजना-

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची हमी लाभावी यासाठी न्यु इंडिया एश्युरन्स लि. यांच्या योजनेनुसार गेल्या वर्षीप्रमाणे 'अपघात विमा' उतरविण्यात आला. तसेच संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांचा ही विमा उतरविण्यात आला.

**शारिरीक पुनर्वसन व आरोग्यविषयक सुविधा-**

पोलिओ पिडीत व इतर कारणांमुळे विकलांग झालेल्या विद्यार्थ्यांची अपंगत्व निर्मुलनासाठीची शस्त्रक्रिया संस्थेमार्फत करण्यात येते. या शस्त्रक्रियांआधी व नंतर आवश्यक असणारे व्यायाम देण्याकरिता संस्थेमध्ये अद्ययावत 'भौतिकोपचार व व्यवसायोपचार कक्ष' असून तज्ञ व्यक्तींकडून या विद्यार्थ्यांवर उपचार केले जातात. अर्थात हे उपचार विद्यार्थ्यांच्या शारिरीक पुनर्वसनाकरिता फार उपयुक्त ठरतात.

येथील विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कृत्रिम अवयव आणि कॅलीपर काठ्या संस्थेतच कृत्रिम अवयव निर्मिती व दुरुस्ती केंद्रात तयार करण्यात येतात. या सर्व प्रयत्नांतून विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने स्वतःच्या पायावर उभे करण्यात येते.

विद्यार्थ्यांना नैमित्तिक आजारावर उनचार करण्यासाठी संस्थेतच चिकित्सालय असून विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी नियमितपणे केली जाते. क्वचित प्रसंगी आवश्यकता वाटल्यास विद्यार्थ्यांवर स्वतंत्रपणे अधिक लक्ष ठेवून उपचारासाठी छोटेसे रुग्णालयही आहे.

निवास व योजन व्यवस्था

संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना निवासाकरिता प्रशस्त व सुविधांनी सुसज्ज असे वसतिगृह असून मुला-मुलींसाठी स्वतंत्र विभाग आहेत. प्रत्येक विभागात १२५ विद्यार्थ्यांची व्यवस्था आहे. एकूण वसतिगृहात २५० पलंगांची अद्ययावत व्यवस्था आहे. संस्थेच्या वसतिगृहास भेट देऊ इच्छिणाऱ्या अभ्यागतांना वसतिगृह अधिक्षकांची पूर्व परवानगी घेवून भेट देता येते.

भोजनाकरिता प्रशस्त असे भोजनगृह आणि स्वयंपाकघर आहे. विद्यार्थ्यांकरिता तयार केलेले अन्न स्वादिष्ट, पौष्टिक आणि सकस असावे याकरिता त्याच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष दिले जाते.

**प्रवेश अर्ज व प्रवेश प्रक्रिया**

दरवर्षी साधारणपणे फेब्रुवारी महिन्यात प्रवेशासंबंधीची जाहिरात स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात देण्यात येते. एप्रिल अखेरपर्यंत प्रवेश अर्ज वितरीत करण्यात येतात. प्रवेश अर्जांची छानणी करुन विद्यार्थी व पालकांना मुलाखातीसाठी बोलविण्यात येते. प्रत्यक्ष मुलाखातीच्या वेळी वैद्यकीय तपासणी करुन यथायोग्य मूल्यमापनानंतर प्रवेश समितीच्या मार्गदर्शनानुसार प्रवेश निश्चित केला जातो.

**भविष्यकालीन योजना-**

१) नवीन शाळा, उच्चशिक्षण व तांत्रिक शिक्षणाकरिता कार्यशाळा व वसतिगृह

२) ग्रामीण भागात मुलांचे वसतिगृहासाठी जमीन व इमारत

३) अपंगत्व निर्मुलनविषयक व पुनर्वसनासंबंधी संशोधन व विकास प्रकल्प उभरणीसाठी १० एकर जमीन

४) स्वतंत्र दवाखाना

५) खेळासाठी अत्याधुनिक साधने घेणे

६) मुलांना सेफ्टी लॉकर्स

७) सौरयंत्राची उभारणी

८) रुग्णवाहिका

९) ७-८ सीटर वाहन इ.

दिव्यांगांच्या समस्यांबाबत अधिक संशोधन होण्याची आवश्यकता आहे. आज त्यांना संस्थेत चांगल्या सोयी-सुविधा, आहार चांगला आहे. आजुबाजुचे वातावरणही पोषक आहे. पण त्यांच्या मानसिकतेबाबत संशोधन व्हायला हवे.

'रिवर्स इंटिग्रेटेड स्कूल' (एकात्मिक शिक्षण) ही संस्थेची भविष्यातील महत्वकांक्षी योजना आहे. सध्या भारतात एकूण ३ शाळा अनुक्रमे भोपाळ, दिल्ली व हैदराबाद येथे आहेत. आपण समाजात पाहतो की, सामान्य मुलांच्या शाळेत २-५ टक्के अपंग मुलांना प्रवेश दिला जातो. एकात्मिक शिक्षण योजनेद्वारे संस्थेला ही क्रिया उलट करावयाची आहे. संस्थेमध्ये अशी एक नवीन शिक्षण पद्धती सुरु करायची आहे की, ज्यामध्ये अपंग मुलांची टक्केवारी जास्त असेल व त्या मुलांबरोबर सामान्य मुलांना शिक्षण दिले जाईल. इ. १ली ते १०वी पर्यंत सामान्य मुलांच्या सानिध्यात दिव्यांग मुलांना दर्जेदार शिक्षण मिळवून दिल्यास त्यांच्या मानसिकतेवर सकारात्मक परिणाम होताना दिसून येईल.

चालता-बोलता आपल्या समोर एखादी अपंग व्यक्ती आली, तर तिच्याकडे पाहण्याचा दोनच दृष्टी आपल्याकडे असतात. एक म्हणजे सहानुभूती आणि दुसरी म्हणजे दुर्लक्ष करणे. पण या दोन्हींच्या पलीकडे जाऊन समाजातील अशा अनेक अपंगांना स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने गेल्या ६० वर्षापासून 'अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था व संशोधन केंद्र' अविरत कार्य करीत आहे. अपंगांप्रती दया दाखवू नका. त्यांना माया द्या, त्यांना कमजोर समजू नका. त्यांना संधी द्या. त्यांना केवळ करुणा नको, तर दानशूर वृत्तीतून त्यांना साहाय्य करा आणि सर्वात महत्वाचे त्यांना सहानुभूती नको तर त्यांना जगण्याचा आत्मविश्वास द्या. अशा स्पष्ट उद्देशाने निर्माण झालेली ही संस्था आता हिरक महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे.

संदर्भ-

*संस्थेचे नाव : अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था व संशोधन केंद्र संस्थेस प्रत्यक्ष भेट व मुलाखत : एम.एन.कचरे- चेअरमन*

*संकेतस्थळ : www.swph.org*

*पुस्तक : अपंग समावकशित शिक्षण - महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई*